# हिंगोली ग्रामीण ठाण्यातर्फे फिरत्या पोलिस ठाण्याद्वारे सुरू झाले कामकाज






प्रतिनिधी/ ६ मार्च

हिंगोली : ६ मार्च रोजी हिंगोली ग्रामीण पोलीस स्टेशन येथे सुसज्ज अभ्यागत व्यवस्थापन प्रणाली कक्ष व फिरते पोलीस स्टेशन चे उद्घाटन विशेष पोलीस महानिरीक्षक चिरंजीव प्रसाद यांचे शुभ हस्ते व पोलीस अधीक्षक अरविंद चावरिया सा, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन गुंजाळ सा, उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल मदने, गृह पोलिस उपअधिक्षक सुजाता पाटील यांचे प्रमुख उपस्थितीत पार पाडले.

पोलिस निरीक्षक जगदीश भंडरवार यांनी त्यांचे अधिपत्याखालील पोलीस उपनिरीक्षक सुप्रिया केंद्रे, पोलीस हवालदार राजेश ठोके, नाईक पोलीस कॉन्स्टेबल अशोक धामणे, महिला पोलीस हवालदार ज्योती खिल्लारे, महिला नाईक प्रतिभा पुरी, चालक संतोष वडे यांची नियुक्ती 'फिरते पोलीस स्टेशन' साठी करून पोलीस स्टेशन पासून लांब अंतरावर असलेले पाडेगाव येथे फिरते पोलीस स्टेशन ने कामकाज करण्यासाठी रवाना केले. या दरम्यान पोलीस ठाण्याचे पथकाने पोलीस सुरक्षा प्रमाणे पोलीस ठाणे चालविले.











हिंगोली- विशेष पोलीस महानिरीक्षक चिरंजीव प्रसाद यांच्या हस्ते फिरते पोलीस ठाणे व्हॅन, निर्भया पुस्तिकेचे प्रकाशन व पोलीस ठाण्यात अभ्यागत व्यवस्थापन प्रणालीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी पोलीस अधीक्षक अरविंद चावरीया, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन गुंजाळ आदी अधिकारी

# कामकाजात अमुलाग्र बदल-चिरंजीव प्रसाद

*प्रतिनिधी/ ६ मार्च*

**हिंगोली :** राज्यामध्ये सध्या प्रगत व गतिमान संकल्पना राबविण्यात येत असल्याने पोलीस प्रशासनाच्या कामकाजात अमुलाग्र बदल घडत असल्याने न्याय मागण्यासाठी येणाऱ्या तक्रारदारांना दिवसेंदिवस सुलभता होत असल्याने त्याचा लाभ घेण्याचे आवाहन नांदेड परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक चिरंजीव प्रसाद यांनी कार्यक्रमातून बोलताना केले.

नांदेड परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक चिरंजीव प्रसाद यांच्या हस्ते ६ मार्च मंगळवार रोजी हिंगोली शहर व हिंगोली ग्रामीण पोलीस ठाण्यातील अभ्यागत व्यवस्थापक प्रणालीचे उद्घाटन करण्यात आले. तसेच १३ लाख रूपये खर्चातून उभारलेल्या नूतन महिला विश्रांती कक्षाचे, हिंगोली ग्रामीण पोलीस ठाण्यात फिरते पोलीस ठाणे व नवीन पोलीस वसाहतीमध्ये कम्युनिटी सभागृहाच्या सुसज्ज भोजन कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. त्याचप्रमाणे हिंगोली शहर पोलीस ठाण्याच्या आवारात निर्भया पोलीस मित्रांचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी व्यासपीठावर विशेष पोलीस महानिरीक्षक चिरंजीव प्रसाद, जिल्हा पोलीस अधीक्षक अरविंद चावरीया, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन गुंजाळ यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक गृह पोलीस उपाधीक्षक सुजाता पाटील यांनी केले. यावेळी पोलीस अधीक्षक चावरीया यांनी बोलताना जिल्हा पोलीस दलाच्यावतीने अनेक वेगवेगळे उपक्रम राबविले जात असून जुनमध्ये निर्भया महिला मित्र सुरू झाल्यानंतर जुलै महिन्यात निर्भया मित्रांच्या नियुक्त्या करून त्यांना प्रशिक्षण देण्यात आले. ग्रामीण भागात अंतर खूप असल्याने तक्रार देण्याकरीता महिलांना अडचण होत होती. बऱ्याच महिलांसह मुलींना यामुळे न्याय मिळाला आहे. डिसेंबर महिन्यात निर्भया महिला मित्रांचा सत्कार करून त्यांना ओळख पत्राचे वाटप करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. उद्घाटनपर बोलताना चिरंजीव प्रसाद यांनी सांगितले की, पोलीस दलात सन २००० पासून ३० टक्के महिलांची नियुक्ती केली होती; परंतु शासनाने नियम बदलल्याने आता त्यापेक्षा अधिक महिलांची नियुक्ती केली जात आहे. राज्यात प्रगत व गतिमान प्रशासन राबविण्यात येत असल्याने दिवसेंदिवस पोलीस प्रशासनाच्या अनेक कामकाजात अमुलाग्र बदल घडत आहेत. त्यामुळे पोलिसांकडे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तींचे निरसन होत आहे. त्यातच आता पोलीस ठाण्यामध्ये अभ्यागत कक्ष सुरू करण्यात आले असून त्याद्वारे ठाण्यात अभ्यागताचे काम कमीत कमी वेळात विना विलंब पूर्ण व्हावे व त्यातून त्याचे समाधान व्हावे या उद्देशाने त्याचे नाव, मोबाईल क्रमांक, फोटोग्राफ्स, ओळखपत्र, त्यांच्या आगमनाची व निर्गमनाची वेळ व कामाच्या स्वरूपाची माहिती संगणकात घेऊन त्यांच्या कामाचा निपटारा केला जाणार आहे. प्रत्येक नागरिकांनी आपल्या अधिकाराची व कर्तव्याची जाण ठेवावी असे आवाहन प्रसाद यांनी शेवटी केले. सुत्रसंचलन प्रा.माधुरी शास्त्री तर आभार प्रदर्शन महिला पोलीस उपनिरीक्षक प्रेमलता गोमासे यांनी केले. यावेळी चिरंजीव प्रसाद यांच्यासह व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते निर्भया पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. त्यानंतर विविध क्षेत्रात नाव लौकीक मिळविणाऱ्या महिलांचा सत्कारही करण्यात आला. कार्यक्रमात उपविभागीय पोलीस अधिकारी राहूल मदने, डॉ.सिद्धेश्वर भोरे, पोलीस निरीक्षक अशोक मैराळ, जगदीश भंडरवार, राखीव पोलीस निरीक्षक बोर्डे, पोउपनि तान्हाजी चेरले आदींची उपस्थिती होती. शेवटी नवीन पोलीस वसाहतीमध्ये कम्युनिटी सभागृहाच्या सुसज्ज भोजन कक्षाचे उद्घाटन आयजी चिरंजीव प्रसाद यांनी केले. यावेळी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मारोती थोरात यासह इतर अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.